


दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार २३ नोव्हेंबर २०२४ | अंक ३४९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

# उत्सुकता शिगेला : कोणते सहा उमेदवार होणार जिल्ह्याचे कारभारी आज निकाल



बीड दि.२२ (बातमीदार): विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या उमेदवारांपैकी कोणाच्या इच्छा आणि अपेक्षा पूर्ण होतात हे आज स्पष्ट होणार आहे. कोणत्या मतदार संघाचा आमदार कोण? कोणते सहा होणार कारभारी? याची उत्सुक्ता शिगेला पोहचली असून अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्याला शुभेच्छा देणारे बॅनर तयार केले आहेत. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये मोठा राजकीय संघर्ष पहायला मिळाला. राज्यामध्ये मोठ्या नेत्यांनी सभा उत्सुकता शिगेला : कोणते सहा होणार जिल्ह्याचे कारभारी घेवून आरोपांच्या तोफांनी विरोधकांना घायाळ करण्याचे प्रयत्न केले. बीड जिल्ह्यामध्ये अनेकांना वेगवेगळ्या राजकीय पक्षाकडून उमेदवारी न मिळाल्याने अपेक्षा भंग झाला. आष्टी–पाटोदा–शिरूर मतदार संघात महायुतीमधीलच तिनही उमेदवार रिंगणात होते. विद्यमान आ.बाळासाहेब आजबे यांनी अजित पवारांकडून तर माजीमंत्री सुरेश धस यांनी भाजपकडून आणि तर माजी आमदार भीमराव धोंडे अपक्ष म्हणून निवडणुकीच्या मैदानात उतरले होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने महेबूब शेख यांना उमेदवारी दिली. त्यामुळे आष्टीच्या निकालाकडे जिल्ह्याचे लक्ष लागून आहे. परळीमध्ये मंत्री धनंजय मुंडे हे निवडणुक लढवत असल्यामुळे परळीकडे देखील राज्याचे लक्ष लागलेले आहे. बीड मतदार संघात चुलत भाऊ एकमेकांसमोर लढले. तर गेली पाच वर्ष निवडणुक लढविण्याची तयारी करणाऱ्या अनिल जगताप यांना शिंदेसेनेकडून उमेदवारी न मिळाल्याने अपक्ष म्हणून त्यांनी निवडणुक लढविली. माजलगावात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश करूनही उमेदवारी न मिळाल्याने रमेश आडसकर यांनी निवडणुक लढविली. गेवराईत भाजपा सोडून विद्यमान आ.लक्ष्मण पवार अपक्ष तर पुन्हा एकदा घड्याळ या चिन्हावर विजयसिंह पंडित आणि माजीमंत्री बदामराव पंडितांनी मशाल हाती घेवून निवडणुक लढविली. केजमध्ये माजी आमदार पृथ्वीराज साठे, विद्यमान आ.नमिता मुंदडा यांच्यात सामना रंगला. मतदान प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर कोणत्या मतदार संघातून कोण निवडून येतो याकडे जिल्हावासियांचे लक्ष लागून आहेच परंतू उत्सुक्ता देखील शिगेला पोहचली आहे. अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्याला आमदार म्हणून शुभेच्छा देणारे बॅनर देखील तयार केले आहेत.

## गेवराई विधानसभेत काय घडणार?, महायुती, मविआला मोठा धक्का?

गेवराई हा बिड लोकसभा मतदारसंघातील एक महत्त्वाचा विधानसभा मतदारसंघ आहे. या मतदारसंघात कधी राष्ट्रवादी काँग्रेसचं वर्चस्व राहिलं तर कधी भाजपचं. सलग दोन विधानसभा टर्म इथे भाजपचा आमदार होता. मात्र यावेळी ही जागा महायुतीमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाला सुटली. राष्ट्रवादीकडून या मतदारसंघात विजयसिंह पंडित यांना उमेदवारी देण्यात आली. मात्र त्यापूर्वी अंतर्गत वादातून भाजप आमदार लक्ष्मण पवार यांनी भाजपमधून बाहेर पडत आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. तर शिवसेना ठाकरे गटाकडून या मतदारसंघात माजी मंत्री बदामराव पंडित यांना उमेदवारी देण्यात आली. तर वंचितकडून देखील या मतदारसंघात यावेळी तगडा उमेदवार देण्यात आला. वंचित बहुजन आघाडीकडून प्रियांका शिवप्रसाद खेडकर या निवडणुकीच्या रिंगणात होत्या त्यामुळे या मतदारसंघात या विधानसभेला चौरंगी लढत पहायला मिळाली. महायुतीकडून विजयसिंह पंडित, महाविकास आघाडीकडून बदामराव पंडित तर अपक्ष उमेदवार लक्ष्मण पवार आणि वंचित बहुजन आघाडीकडून प्रियांका शिवप्रसाद खेडकर अशी चौरंगी लढत होती. सर्वच तगडे उमेदवार असल्यामुळे या मतदारसंघाच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं होतं. लक्ष्मण पवार हे अपक्ष उमेदवार असूनही त्यांनी सुरुवातीपासूनच या मतदारसंघात आघाडी घेतली होती. तर वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार प्रियकां खेडकर यांना देखील या मतदारसंघात चांगला पाठिंबा मिळताना दिसत होता. त्यामुळे उत्सुकता शिगेला पोहोचली होती.

## निकालापूर्वी भुजबळ म्हणाले, बंटेंगे तो कटेंगे महाराष्ट्रात चालले नाही:

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक निकालाचा आज दिवस आहे. राज्यात कोणाचे सरकार येणार? हे स्पष्ट होणार आहे. या निवडणूक निकालापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे बडे नेते आणि शिंदे मंत्रिमंडळातील मंत्री छगन भुजबळ यांनी महत्वाचे विधान केले आहे. बंटेंगे तो कटेंगे' महाराष्ट्रात चालले नाही, असे भुजबळ यांनी म्हटले आहे. राज्यात महायुतीचे सरकार येणार



असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महायुतीचे सरकार येणार निकालावर मत व्यक्त करताना छगन भुजबळ म्हणाले, राज्याचा निकाल हा स्पष्ट आहे. अनेक सर्व्हे करणाऱ्या संस्थांनी जनतेचा कल सांगितला आहे. त्यामुळे राज्यात महायुती सरकार बनवणार आहे. कोण म्हणते बहुमतापेक्षा महायुतीला दहा जास्ती असेल, कोण म्हणते पन्नास जागा जास्त असतील, कोणी म्हणते पंचवीस जागा जास्त असेल. परंतु महायुतीचे सरकार बनवणार आहे. महाविकास आघाडीला जनतेने नाकारले आहे.

## पोलिसांचा पक्षपातीपणा; खा.सोनवणेकडून त्या हल्लेखोरांच्या अटकेची मागणी

बीडः परळीत बोगस मतदान रोखण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते ॲड.माधव जाधव यांच्यावर २० नोव्हेंबर रोजी परळी येथे जीवघेणा हल्ला करण्यात आला. पोलीसांसमोर हल्ला होऊनही गुन्हा दाखल केला नसून पोलिसांकडून पक्षपातीपणा सुरू आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करून हल्लेखोरोंना अटक करावी, असे अवाहन खा.बजरंग सोनवणे यांनी पोलिस अधिक्षकांना केले आहे. प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे, परळीत बोगस मतदान रोखण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते ॲड.माधव जाधव यांच्यावर २० नोव्हेंबर रोजी परळी येथे जीवघेणा हल्ला करण्यात आला. याच परिसरात उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या सुरक्षा रक्षकांनाही हल्लेखोरांकडून दमदाटी करण्यात आली. हा प्रकार पोलीस यंत्रणेसमोर घडूनही अद्यापपर्यंत हल्लेखोरांवर कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. उलट, आकसापोटी उमेदवारांच्या नातेवाईकांवर गुन्हे दाखल केले जात आहेत. हा पक्षपातीपणा खपवून घेतला जाणार नाही. बीड पोलीस अधीक्षक यांना माझे आवाहन आहे, ॲड.माधव जाधव यांच्यावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांवर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक



करावी. अन्यथा, लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, व त्याच्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी पोलीस अधीक्षकांवर असेल, असेही खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे. शिवाय परळीत मतदान सुरू असताना अनेक ठिकाणी मतदारांनाही दमदाटी करण्याचे प्रकार घडले असून पोलीसांच्या अंगावरही विरोधकांचे कार्यकर्ते धावून गेलेले आहेत. असे असताना पोलीसही शांत आहेत. येणाऱ्या काळात हे असेच वाढत जाऊन लोकशाही धोक्यात येण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी बघ्याची भुमीका न घेता दोषींवर निपक्षपातीपणे कारवाई करावी, असेही म्हटले आहे.

## सेवानिवृत्त कर्मचारी गुलाबसाब शेख यांचे निधन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : उमरा ता.लोहा येथील ज्येष्ठ नागरिक किसान विद्यालयातील सेवानिवृत्त कर्मचारी गुलाबसाब मंगलसाब शेख (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने दि.२२-नोव्हेंबर शुक्रवारी रात्री २ वाजता निधन झाले असून त्यांच्यावर उमरा येथे दुपारी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा नातू असा मोठा परिवार असून उस्मान शेख,करीम शेख यांचे बंधू तर किसान विद्यालय उमरा येथील कर्मचारी शादुल शेख यांचे ते वडील होत.गुलाबसाब हे अत्यंत शांत प्रिय व प्रेमळ व्यक्ती होते.त्यांच्या अकाली निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २३ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# वर्चस्वाचा फैसला !

भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील सर्वात चुरशीच्या विधानसभा निवडणूकीसाठी परवा महाराष्ट्रात तेवढ्याच चुरशीने मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर आता नाकालाची प्रतीक्षा आहे. आणखी काही तासांत म्हणजे आज शनिवारी मतदारांनी कोणाच्या बाजूने कौल दिला आहे हे स्पष्ट होणारच आहे. पण एकूणच परिस्थिती पाहता महाराष्ट्र विधानसभेची ही निवडणूक वर्चस्वाची लढाई म्हणावी लागेल. सत्ताधारी महायुती आणि विरोधी बाकावर बसलेली महाविकास आघाडी यांच्यामधील हा सत्तेसाठी राजकीय संघर्ष असला, तरीसुद्धा गेल्या अडीच वर्षांच्या कालावधीमध्ये महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये ज्या घटना घडल्या त्यानिमित्ताने ही वर्चस्वाची लढाई ठरणार आहे. राष्ट्रीय पातळीवर निवडणुकीच्या राजकारणात एकमेकांचे प्रमुख स्पर्धक असलेला भाजप आणि काँग्रेस यांच्यामधील तर ही वर्चस्वाची लढाई आहेच. शिवाय गेल्या कालावधीत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यामध्ये फूट पडल्यामुळे यापैकी कोणता गट प्रभावशाली आहे हे सिद्ध करणारीसुद्धा ही वर्चस्वाची एक वेगळी लढाई या निवडणुकीमध्ये लढली गेली आहे. मतदारांच्या कौलाचा निकाल समोर आल्यावर निश्चित कोणी वर्चस्व राखले हेच समोर येणार आहे. ज्याप्रकारे या निवडणुकीत उमेदवार समोरासमोर उभे होते ते पाहता ही वर्चस्वाची लढाई जास्तच ठळकपणे समोर येते. महाराष्ट्रातील २८८ जागांपैकी काँग्रेसने १०१ जागांवर तर भाजपने १४९ जागांवर आपले उमेदवार उभे केले आहेत. काँग्रेस आणि भाजपमध्ये तब्बल ७३ जागांवर थेट लढत आहे. अवघ्या ६ महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपला जोरदार झटका बसला होता. २०१९ मध्ये भाजप आणि काँग्रेस ६६ जागांवर आमनेसामने असताना ५० जागा भाजपच्या खात्यात गेल्या, तर काँग्रेसला केवळ १६ जागा मिळाल्या होत्या. या इतिहासाचा आधार भाजपला मिळत आहे. दुसरीकडे ५० जागांवर शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत होणार आहे. म्हणजेच शिवसेना आणि राष्ट्रवादी फुटल्यानंतर महाराष्ट्रात पहिली विधानसभा निवडणूक होत असल्याने एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांच्यात वर्चस्वासाठी ही मोठी लढत आहे. उद्धव ठाकरे यांनी दिलेला गद्दारांविरुद्धचा नारा यशस्वी ठरणार की ही गद्दारी नव्हती तर उठाव होता हा एकनाथ शिंदे यांचा युक्तिवाद यशस्वी ठरणार हे समजणार आहे. राज्यात ३७ जागांवर अजित पवार–शरद पवार यांच्यात लढत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर ही आणखी एक वर्चस्वाची लढाई लक्षणीय ठरत आहे. गेल्या ३ वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्रात पक्षपुटीच्या ज्या घटना घडल्या त्याकडे राज्यातील मतदार कसा पाहतो हेसुद्धा पुन्हा एकदा अधोरेखित होणार आहे. लोकसभा निवडणुकीत मतदारांनी चुणूक दाखवली असली, तरी त्यांची तीच भावना कायम आहे का हेसुद्धा सिद्ध होणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालाने महायुतीला जागे केले आणि त्यांनी बऱ्यापैकी डॅमेज कंट्रोल केले आहे. एकीकडे लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर भाजपने आता विधानसभा निवडणुकीत असे होणार नाही, असा दावा केला आहे. महायुती सरकारची ङ्गलाडकी बहीणफ योजना महिलांना आकर्षित करणारी ठरली आहे का, हेही या निवडणुकीत समजेल. काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात महिलांना ३ हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे, हेही विशेष. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात महाविकास आघाडीचा प्रभाव जास्त आहे, पण लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची संख्याही ग्रामीण भागातच जास्त आहे. काही महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये जरी महाविकास आघाडीने महायुतीला जोरदार दणका दिला असला आणि राष्ट्रीय पातळीवरही भाजपचा प्रभाव कमी झाला असला, तरी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा आपले वर्चस्व निर्माण करण्याची संधी भाजप या निवडणुकीच्या निकालामध्ये शोधत आहे. विविध राजकीय पक्षांनी प्रचाराच्या कालावधीमध्ये विविध मुद्द्यांना स्पर्श केला असला तरी ऐनवेळी घडलेल्या घटनांचा निवडणुकीतील मतदारांच्या मानसिकतेवर कसा परिणाम होतो हेसुद्धा पाहावे लागते. मतदानाच्या आधी काही तास अगोदर घडलेल्या घटनासुद्धा प्रभावशाली ठरू शकतात. याच पार्श्वभूमीवर अनिल देशमुख यांच्यावर झालेला हल्ला असो किंवा विरार येथे भाजपचे ज्येष्ठ नेते विनोद तावडे यांची घटना असो किंवा सुप्रिया सुळे आणि नाना पटोले यांच्या संबंधात समोर आलेली बिटकॉइनच्या गुंतवणुकीची अफवा असो हे विषय मतदारांना कितपत महत्त्वाचे वाटतात हेसुद्धा पाहावे लागणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या कालावधीमध्ये काही फेक नॅरेटिव्ह उपयुक्त ठरल्याचे सगळ्यांच्याच लक्षात आल्याने त्याच प्रकारचे विषय समोर आणून मतदारांची मानसिकता तयार करण्याची रणनीतीसुद्धा आखली गेली आहे. पण महाराष्ट्राच्या राजकीय व्यासपीठावर गेल्या काही कालावधीमध्ये घडलेल्या पक्षफुटीच्या घटना आणि त्यानंतर सर्वसामान्य मतदारांना आकर्षित करण्यासाठी सरकारकडून झालेला घोषणांचा पाऊस आणि काही तत्कालीन प्रभावशाली घटना या सर्वांचा एकत्रित विचार करून मतदारांनी कोणाच्या बाजूने कौल दिला आहे हे आज समजणार आहे. अर्थात, या निमित्ताने महाराष्ट्राच्या राजकीय व्यासपीठावरील लढलेल्या वर्चस्वाच्या लढाईचा फैसला आज समोर येणार आहे. केवळ महाराष्ट्राच्या

# ११ फेब्रुवारी पासून १२वीची तर२१ फेब्रुवारी पासून दहावी ची लेखी परीक्षा सुरु होणार

पुणे/ प्रतिनिधी:-
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात येणाऱ्या बारावी आणि दहावीच्या परीक्षेचे अंतिम वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत घेतली जाणार असून, दरवर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे आठ ते दहा दिवस परीक्षा लवकर होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.राज्य मंडळाचे सचिव देविदास कुल्हाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे अंतिम वेळापत्रकाबाबतची माहिती दिली. राज्य मंडळाच्या वेळापत्रकानुसार बारावीची प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन, तोंडी परीक्षा २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत, तर दहावीची प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन, तोंडी परीक्षा ३ ते २० फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. परीक्षेचे विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक २१ नोव्हेंबरपासून राज्य मंडळाच्या http//www.mahasscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाणार आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकाची सुविधा ही केवळ माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांकडे छापील स्वरुपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या तारखांची खात्री करून परीक्षा द्यावी. अन्य संकेतस्थळांवरील किंवा यंत्रणेने छपाई केलेले, व्हॉट्सअॅप किंवा तत्सम माध्यमातून प्रसिद्ध झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये, असेही स्पष्ट करण्यात आले.दरवर्षी बारावीची परीक्षा फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात, दहावीची परीक्षा मार्चच्या पहिल्या आठवड्यात सुरू होते. त्यानंतर निकाल मे-जूनमध्ये जाहीर केला जातो. या दरम्यान विविध प्रवेश परीक्षा होतात. तसेच नियमित परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठीची पुरवणी परीक्षा जुलै ऑगस्टमध्ये होते. या सर्व प्रक्रियेत जाणारा वेळ, विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ मिळणे, प्रवेश प्रक्रिया लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने राज्य मंडळाने यंदा बारावी-दहावीच्या परीक्षा आठ ते दहा दिवस लवकर घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार अंतिम वेळापत्रक तयार करण्यात आले आहे.

# कल्याण ग्रामीण मध्ये तिरंगी लढत

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या जागांपैकी कल्याण ग्रामीण मतदारसंघाची जागा आहे. कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघात तीन ताकदवान उमेदवार असल्यामुळे या मतदारसंघाच्या निवडणुकीबाबत मोठा सस्पेन्स निर्माण झाला होता. गेल्या विधानसभा निवडणुकीत या मतदारसंघातून मनसेचे राजू पाटील जिंकून आले होते. राजू पाटील हे राज्यातील मनसेचे एकमेव आमदार ठरले होते. राजू पाटील यांची गेल्या पाच वर्षात लोकप्रियता देखील वाढली आहे. राजू पाटील हे



बेधडकपणे विविध मुद्द्यांवर भूमिका मांडत आले आहेत. त्यामुळे त्यांचा एक वेगळा चाहता वर्ग मतदारसंघात आणि महाराष्ट्रात निर्माण झालाय. पण कल्याण ग्रामीणच्या निवडणुकीत शिवसेना ठाकरे गट आणि शिवसेना शिंदे गटाकडून देखील तितक्याच ताकदीचे उमेदवार देण्यात आले. त्यामुळे या निवडणुकीत चुरस वाढली. कल्याण ग्रामीणमध्ये ठाकरे गटाकडून सुभाष भोईर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. सुभाष भोईर हे 2014 च्या निवडणुकीत शिवसेनेच्या तिकीटावर जिंकून आले होते. पण 2019 च्या निवडणुकीत पक्षाने त्यांचं तिकीट कापून रमेश सुकऱ्या म्हात्रे यांना दिलं होतं. अटीतटीच्या लढतीत गेल्या निवडणुकीत राजू पाटलांचा विजय झाला होता. त्यानंतर कल्याण ग्रामीणच्या मतदारसंघात उद्धव ठाकरे यांनी आपला हुकमी एक्का सुभाष भोईर यांना मैदानात उतरवलं. सुभाष भोईर यांना या निवडणुकीत सहानुभूतीचा मोठा फायदा होताना दिसला. मतदारसंघात सर्वसामान्य जनतेत मशालची चर्चा सुरु होती. असं असलं तरी राजू पाटील यांच्याविषयी देखील तशीच चर्चा होती. तसेच शिवसेनेचे उमेदवार राजेश मोरे यांच्याबाबत चर्चा होती.

# सत्तेच्या चाव्या आपक्षा च्या हाती राहणार:

–निवडणुक विषेश प्रतिनिधी:–
राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी महाराष्ट्रात २० नोव्हेंबर रोजी म तदानप्रक्रिया पार पडली. त्यामध्ये, राज्यात सरासरी ६५.१० टक्के मतदान झालं असून मुंबई मराठी पत्रकार संघात महाराष्ट्र विधानसभेच्या निकालासाठी अंदाज वर्तविण्याची स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत मुंबईसह म हाराष्ट्र राज्यातील पत्रकारांनी उत्स्फ ूर्त सहभागनोंदविला. या स्पर्धेतील सरासरी अंदाजानुसार भाजपाप्रणीत महायुती ही १४० जागापर्यंत मजल म ारू शकते, तर मविआची झेपही १३८ जागापर्यंत पोहचू शकते असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यानुसार, इतर व अपक्षांसाठी १० जागांचा अंदा व्यक्त करण्यात आला आहे. एकूणच या अंदाज स्पर्धेनुसार महाराष्ट्रात त्रिशंकू विधानसभा अस्तित्वात येऊन अपक्षांची भूमिका किंगमेकरची राहील, असे चित्र आहे. त्यामुळे, राज्याच्या विधानसभा निवडणुकासाठीच्या निकालाचीही चुरस आणखी वाढली आहे. मतदानानंतर विविध संस्थांच्या सर्वेक्षणातून महायुतीला स्पष्ट बहुमत दर्शविण्यात आले होते. त्यामध्ये, १० पैकी ७ संस्थांनी महायुती बहुमताचा आकडा पार करेल असा अंदाज होता. तर, ३ सर्वेक्षण संस्थांनी महाविकास आघाडीला बहुमत मिळेल, असा अंदाज वर्तवला आहे.देशातील अनेक राजकीय सर्वेक्षण करणा–या संस्थांनी भाजप महायुती आणि काँग्रेस महाविकास आघाडी यांच्या काँटे की टक्कर दर्शवली आहे. मात्र, राज्यात नंबर १ चा पक्ष हा भाजपा राहील आणि त्यानंतर दुसर्या क्रमांकावर काँग्रेसचा क्रमांक लागेल, असा अंदाजही या चुरशीच्या लढतीत वर्तवण्यात आला आहे. यंदाच्या निवडणुकीतील मतदानानं तर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी सर्वाधिक पसंती ही देवेंद्र फडणवीस यांना मिळाली असून त्यानंतर दुस–या क्रमांकावर उद्धव ठाकरे तर तिस–या क्रमांकावर एकनाथ शिंदेंना पसंती देण्यात आली. सत्तेची चावी अपक्षांच्या...!२३ नोव्हेंबरला विधानसभेचा निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे अचूक अंदाज वर्तवणार्या पत्रकारांना रोख रकमेची पारितोषिके आणि सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे, अशी माहिती स्पर्धा समन्वयक आत्माराम नाटेकर यांनी दिली.एक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलनुसार विदर्भातील ६२ जागा वगळता १५० जागा मिळत असून त्यांना बहुमत मि ळेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. महाविकास आघाडीला पाच विभागात केवळ ७६ जागा मिळतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. महायुतीला पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, मुंबई, कोकण आणि उत्तर महाराष्ट्रातून सर्वाधिक जागा मिळतील, असा अंदाज एक्सिस माय इंडियानं वर्तवला आहे. एक्सिस माय इंडियाच्या पोलनं २८८ जागांचा एक्झिट पोल जाहीर केला आहे.त्यानुसार महाविकास आघाडीला जोरदार धक्का बसताना पाहायला मिळत आहे.महाविकास आघाडीला २८८ पैकी केवळ ८२–१०२ जागा मिळतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. महाविकास आघाडीला पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबई वगळता इतर ठिकाणी फार यश मिळत नसल्याचा अंदाज एक्सिस माय इंडियाच्या पोलमध्ये वर्तवण्यात आला आहे. इतरांना ६–१२ जागा मि ळतील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# लोकशाहीच्या उत्सवात बीडमध्ये दुर्दैवी घटना



## हृदयविकाराचा झटका आल्याने अपक्ष उमेदवाराने मतदानकेंद्रावरच सोडले प्राण

बीड (प्रतिनिधी): राज्यभर लोकशाहीचा उत्सव साजरा केला जात असतानाबीड विधानसभा मतदारसंघातून दुर्दैवी घटना सम ोर आली आहे. मतदारसंघातील अपक्ष उमेदवार बाळासाहेब शिंदे यांचा हृदयविकाराचा झटक्याने दुर्दैवी मृत्यू झाला आहे. बाळासाहेब शिंदे बीड मतदारसंघातून अपक्ष म्हणून रिंगणात उतरले होते. परंतु ऐन मतदानाच्या दिवशी त्यांची प्राणज्योत म ालवली आहे. बाळासाहेब मतदान केंद्रावर आले असता त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांनी जागीच आपला श्वास सोडला.विधानसभा निवडणुकांची रणधुम ाळी सुरू असताना काही मतदारसंघात गोंधळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या परळी मतदारसंघातील घाटनांदूर येथे राडा झाल्याचे पाहायला मिळाले. परिणामी तीन मतदान केंद्रावर १ तास मतदान यंत्रणा बंद होती. त्यामुळे, बीड जिल्ह्यातील मतदानाचा दिवस चांगलाच चर्चेत आला आहे. एकीकडे राड्यामुळे बीड जिल्ह्यातील वातावरण तापले असताना दुसरीकडे बीड विधानसभा मतदारसंघातून दुर्दैवी आणि धक्कादायक घटना समोर आली. बीड विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार बाळासाहेब शिंदे यांचा मतदान केंद्रावरच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला आहे. आपल्या तरुण उमेदवाराचा मृत्यू झाल्याने कार्यकर्त्यांना मोठा धक्का बसला आहे. तर त्यांच्या कुटुंबावरही दुखाचा डोंगर कोसळला आहे. बाळासाहेब शिंदे बौड विधानसभा मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढवत होते. दरम्यान ते आज मतदानाच्या दिवशी ते बीड शहरातील छत्रपती शाहू विद्यालयात असणाऱ्या मतदान केंद्रावर आले होते. यादरम्यान धक्का बसला अनब ते खाली कोसळले. त्यानंतर, कार्यकर्त्यांनी त्यांना तात्काळ बीड शहरातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, तेथून त्यांना छत्रपती संभाजी नगर येथील रुणालयात नेण्यात आले. पण, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या दुर्दैवी घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. शिंदे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून उमेदवार शिंदे यांच्या कार्यकर्त्यांनाही या घटनेने मोठा धक्का बसला आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २३ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# पाटोदा व नेकनुर ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर युनिट सुरु करण्याचा प्रस्ताव डॉ. अशोक थोरातांकडुन उपसंचालकांना सादर

बीड-प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनुर येथील स्त्री व कुटीर रूग्णालय आणि पाटोदा ग्रामीण रूग्णालय याठिकाणी राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या अपघातामुळे ट्रॉमा केअर सेंटरची आवश्यकता असुन तातडीने सुरू करण्यात यावे यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे मागणी करत आंदोलनाचा ईशारा डॉ. अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांना दिला होता. याची दखल घेत डॉ. अशोक थोरात यांनी नेकनुर आणि पाटोदा येथील ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर सुरू



करण्यात यावे याबबतचा प्रस्ताव उपसंचालक आरोग्य सेवा लातुर मंडळ लातुर यांना पाठवला आहे. अहमदपूर ते अहमदनगर आणि पैठण ते पंढरपूर या दोन राष्ट्रीय महामार्गावरील अतिवेगाने वाहन चालवणे त्याचबरोबर उखडलेले रस्ते आणि रखडलेल्या कामांमुळे वाढत्या अपघातांची संख्या पाहता तातडीने उपचार न मिळाल्याने अपघातग्रस्तांना आपला जीव गमावावा लागत असुन तातडीने पाटोदा आणि नेकनुर ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात यावे अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे डॉ. गणेश ढवळे, शेख युनुस, स्वप्निल गलधर, निळकंठ वडमारे, विजय लव्हाळे, शेख मुबीन यांनी डॉ. अशोक थोरात जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांना करत दि.१२ डिसेंबर रोजी आंदोलन करण्यात येणार असल्याचा ईशारा दिला होता. त्यापुर्वीच याची दखल घेत डॉ. अशोक थोरात यांनी पाटोदा व नेकनुर ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यासाठीचा प्रस्ताव उपसंचालक आरोग्य सेवा मंडळ लातुर यांना पाठवला आहे. याठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर सुरु झाल्यास बऱ्याच अपघातग्रस्तांना

# राज्यात भाजपा महायुतीचं सरकार बहुमताने येणार- आ. पंकजाताई मुंडे

परळी (प्रतिनिधी): राज्यभरात मी अनेक ठिकाणी प्रचार सभा घेतल्या, त्याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. महायुतीच्या सरकारने राबवलेल्या योजनांमुळे लोकांचा विश्वास वाढलाय, त्यामुळे राज्यात भाजपा महायुतीचे सरकार बहुमतांनी येईल असा विश्वास भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा स्टार प्रचारक आ. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे माध्यमांशी बोलतांना व्यक्त केला. आमची परळीची जागा रेकॉर्डब्रेक मतांनी निवडून येईल असेही त्या म्हणाल्या. नाथरा येथे मतदानाला जाण्यापूर्वी आ. पंकजाताई मुंडे यांनी



निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधला त्यावेळी त्या बोलत होत्या. गेल्या तीन तारखेपासून मी प्रचारात आहे. राज्यात वेगवेगळ्या क्षेत्रात सभा घेतल्या, सर्व ठिकाणी चांगला प्रतिसाद मिळाला. महायुती बाबत जनता सकारात्मक आहे. सरकारने जनतेच्या हितासाठी ज्या काही योजना राबवल्या आहेत, त्या यशस्वी ठरल्या आहेत, लोकांचा महायुतीबद्दल विश्वास वाढला आहे. त्यामुळे आमचं सरकार बहुमतांनी पुन्हा सत्तेवर येईल. फेक नरेटिव्हचा या निवडणूकीत परिणाम होणार नाही. २०१९ मध्ये निवडणूक लढवत असताना देखील मी महाराष्ट्रात सभा घेत होते, मला ही निवडणूक फारशी वेगळी वाटली नाही असं त्या एका प्रश्नांच्या उत्तरात बोलताना म्हणाल्या. परळीच्या निवडणुकीबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, ही निवडणूक सहज व सोपी झाली. महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी होतील असा मला विश्वास आहे.

# ईक्जीट पोलच्या अंदाज, पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येणार ...!

मुंबई (वृत्तसंस्था): मागील ५ वर्षांत राज्यात अभूतपूर्व घडामोडी घडल्या. चित्रविचित्र आघाड्या, युत्या राज्यातील जनतेनं पाहिल्या. आपण मत कोणाला दिलं आणि ते नेमकं कुठे गेले, असा प्रश्न मतदारांना पडला. या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आज राज्यात विधानसभा निवडणुकीचं मतदान पार पडलं. या मतदानानंतर विविध एजन्सीचे एक्झिट पोल येऊ लागले आहेत. चाणक्य स्ट्रॅटेजीसच्या सर्व्हेनुसार राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार येऊ शकतं. चाणक्य स्ट्रॅटेजीसच्या सर्व्हेनुसार, महायुतीला १५२ ते १६० जागा मिळू शकतात. बहुमतासाठी १४५ चा जादुई आकडा गरजेचा आहे. तो महायुती पार करेल, असा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे. भाजप सलग तिसऱ्यांदा




भाजप राज्यात विधानसभेत सगळ्यात मोठा पक्ष ठरण्याची शक्यता आहे. सलग तिसऱ्यांदा भाजप ही किमया साधेल असा अंदाज आहे. चाणक्य स्ट्रॅटेजीसच्या सर्व्हेनुसार भाजपला ९० जागा मिळू शकतात. भाजपसोबत सत्तेत असलेल्या शिवसेनेला ४८ जागा, तर अजित पवारांना २२ जागामिळू शकतात. याचा अर्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना त्यांच्या आमदारांचा आकडा कायम राखताना दिसत आहे. तर अजित पवारांना सर्वात मोठा धक्का बसताना दिसताना आहे. अजित पवारांसोबत ४० आमदारांनी शरद पवारांची साथ सोडली. काँग्रेसचे काही आमदारही नंतर त्यांच्यासोबत आले. पण अजित पवारांना मोठा धक्का बसेल असं सर्व्हे सांगतो. दुसरीकडे महाविकास आघाडी १३० ते १३८ जागा जिंकून बहमताच्या जवळ जाताना दिसत आहे. काँग्रेस मविमातील सगळ्यात मोठा पक्षठरू शकतो. त्यांना ६३ जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर शिवसेना उबाठाला ३५, राष्ट्रवादी काँग्रेसला ४० जागा मिळू शकतात. ठाकरेंना शिंदेंच्या तुलनेत कमी यश पाहायला मिळेल असा अंदाज आहे. त्याचा फटका मविआला बसताना दिसत आहे. महायुतीत भाजपनं सर्वाधिक १४८, शिवसेनेनं ८१ आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं ५९ जागा लढवल्या आहेत. तर मविआमध्ये काँग्रेसनं १०१, शिवसेना उबाठानं ९५, तर राष्ट्रवादी शपला ८६ जागा मिळाल्या. राज्यात बसपनं २३७, तर एमआयएमनं १७ उमेदवार दिले होते.

# मतदान केंद्रावरील तोडफोड प्रकरणी 40 जणांवर गंभीर गुन्हे दाखल

## घाटनांदूर येथे झाली होती घटना; आरोपीत बहुतांशी तरुणांचा समावेश

अंबाजोगाई - परळी विधानसभा निवडणुकीत मतदानाच्या दिवशी परळी मतदार संघातील घाटनांदूर (ता. अंबाजोगाई) येथे मतदान केंद्रावर तोडफोडीची घटना घडली होती. याप्रकरणी जवळपास 40 जणांवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात अतिशय गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले. प्रत्येक निवडणुकीत परळी मतदार संघ कुठल्या ना कुठल्या कारणाने चर्चेत असतो. यंदाच्या विधानसभा निवडणुकीतही परळी मतदार संघात राडा झाला. महाविकास आघाडीचे नेते ॲड. माधव जाधव यांना कन्हेरवाडी येथे मारहाण करण्यात आली. व्हिडीओ व्हायरल होताच या मारहाणीचे पडसाद संपूर्ण मतदार संघात उमटले. घाटनांदूर येथील पोलीस चौकीतील पोलीस शिपाई नानासाहेब धुमाळ यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बुधवारी (दि.20) दुपारी 1.30 वाजताच्या सुमारास जि. प. प्राथमिक शाळा, जि.प. कन्या शाळा, सोमेश्वर विद्यालयातील मतदान केंद्रात अचानक 50 ते 60 लोक एमएच 06 एझेड 4208, एमएच 14 एवाय 35 आणि एमएच 44 एस 7716 या वाहनातून घातक हत्यारे, लाकडी दंडुके घेऊन आले.ॲड. माधव जाधव यांना धक्काबुक्की झाल्याच्या कारणावरून त्यांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. पोलिसांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी पोलीस, होमगार्ड आणि केंद्राध्यक्ष यांना घातक हत्यारे आणि दंडुक्यांनी जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात पोलिस कर्मचारी, केंद्राध्यक्ष जखमी झाले. त्यांनतर आरोपींनी ईव्हीएम मशीन आदळून नुकसान केले. सदर फिर्यादीवरून अक्षय कमलाकर मोरे, सुरज अशोक निंबाळकर(दोन्ही रा. मोरेवाडी), शंभूराजे संजय देशमुख (माकेगाव), यशोदीप कल्याण किर्दंत, ओम प्रवीण किर्दंत, वैभव रमेश किर्दत (सर्व रा. सातेफळ), अभिजीत कल्याण देशमुख (नांदडी), सिद्धेश्वर जाधव,सुनील देशमुख, वसंत मारोती करजाळकर बलांडे, नानासाहेब पूसकर देशमुख, विशाल जाधव, गणेश जाधव, विजय जाधव, अजय जाधव, संजय अनंत जाधव, गोट्या जाधव,उमाकांत जाधव (सर्व रा. घाटनांदूर) व इतर15 ते 20 जण असे एकूण जवळपास 40जणांवर कलम बीएनएस 109. 118(1).132, 189(2), 191(2), 191(3), 190, 324(4), 324(5), मालमत्ता विरुपण प्रतिबंधक अधिनियम, लोकप्रतिनिधीत्व अधिनियमान्वये अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले. दरम्यान, गुन्हे दाखल होताच पोलिसांनी काही आरोपींना ताब्यात घेतले. इतर आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत. पुढील तपास एपीआय राजेंद्र घुगे करत आहेत.

# नवीन सरकार आल्यावर मनोज जरांगे यांच्यावर उपोषणाची वेळ येणार नाही, भाजपच्या बड्या नेत्याचे वक्तव्य

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीची मतमोजणी शनिवारी २३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. त्यासाठी मतदान संपल्यावर सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहे. भारतीय जनता पक्षाचे बडे नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महायुतीचे सरकार येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे. तसेच नवीन सरकार आल्यावर मनोज जरांगे पाटील यांच्यावर उपोषण करण्याची वेळ येणार नाही. नवीन सरकार ती परिस्थिती निर्माण होऊ देणार नाही, असे चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे. त्यामुळे नवीन सरकार समोर मराठा



आरक्षणाचा विषय प्राधान्यक्रमाने असणार असल्याचे संकेत मिळत आहे.

काय म्हणाले चंद्रकांत पाटील

भाजप नेते चंद्रकांत पाटील सहपरिवार शुक्रवारी साई दरबारी आली. त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. चंद्रकांत पाटील म्हणाले, सत्ता स्थापनेसाठी आम्हाला जागा कमी पडणार नाही. कमळ, धनुष्यमान आणि घड्याळ यांच्या 160 जागा निवडून येतील. त्यानंतर महायुतीच्या मुख्यमंत्री पदाबाबत निर्णय दिल्लीत तिन्ही पक्षांच्या बैठकीत होईल. आमची संघटना शिस्तीत चालते आहे, कशातच फूट पडली नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा दिल्लीतील नेत्यांवर विश्वास आहे.

जे सोबत येतील त्यांना सोबत घेऊ

एकदा ईव्हीएम मशीनमध्ये मत बंद झाली की अंदाज व्यक्त करून काही बदल होणार नाही. अपवाद सोडला तर सर्व सर्व्हे महायुतीचे सरकार येईल, असेच चित्र दाखवत आहे, असे चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. ते म्हणाले, आमच्या जागा 160 च्या खाली येणार नाही. तसेच जे जे आमच्या सोबत येतील त्यांना बरोबर घेऊ. परंतु सरकार बनवण्यासाठी कुणाला बरोबर घ्यावे लागणारच नाही. विरोधकांना घटनाच मान्य नाही...

चंद्रकांत पाटील म्हणाले, आम्ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेली घटना मानतो. त्या घटनेच्या चौकटीत जे आहे ते आम्हाला मान्य आहे. घटनेच्या चौकटीच्या बाहेर जाऊन आम्हाला कधी न्याय मिळाला नाही आणि मिळू शकत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेत ज्या संस्था म्हणजेच ईडी , हायकोर्ट, सुप्रीम कोर्ट, निवडणूक आयोग आहे. परंतु या संस्था विरोधकांना मान्य नाही. एका बाजूने संविधान बचावचा नारा द्यायचा आणि दुसरीकडे संविधानातील कुठलीच परंपरा मानायची नाही, अशी टीका चंद्रकांत पाटील यांनी महाविकास आघाडीवर केली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २३ नोव्हेंबर २०२४
https://lokaarambh.com



# महायुतीच्या नमितााताई मुंदडा ,व महाविकास आघाडीचे पृथ्वीराज साठे यांच्या सह आपक्षाचे २३तारखेवर लक्ष

केज , प्रतिनधी:-केज मतदार संघातील प्रमुख तीन राजकीय पक्षांसह अपक्षांचा बोलबाला मतदारसंघात पहावयास मिळाला आहे केज मतदार संघामध्ये भारतीय जनता पार्टीचे उमेदवार नमितााताई मुंदडा राष्ट्रवादी गटाचे गटाचे पृथ्वीराज साठे त्याचबरोबर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रमेश तात्या गालफाडे शेवटी वंचित आघाडीचे पुरस्कृत उमेदवार डॉ . महावीर सोणवने त्यामुळे विजयी नक्की कोण होणार याचे स्पष्ट चित्र झालेले नाही कुणामुळे कुणाला फटका बसणार हे निश्चितपणे सांगता येणे हे शक्य नाही. त्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे हे आघाडीवर दिसत आहे तर महायुतीचे उमेदवार नमितााताई मुंदडा यांची तगडी यंत्रणा ही अगदी गाव खेड्यात मोठ्या प्रमाणावर होती. तर मनसे उमेदवार रमेश तात्या गालफाडे यांची यंत्रणा मात्र रामभरोसे होती. भाजपा ऊमेदवार नमितााताई मुंदडा यांच्यासाठी भाजपच्या नेत्या आ. पंकजा मुंडे यांनी दोन सभा तसेच वरिष्ठ नेते केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सभा घेतल्या तर राष्ट्रवादीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्यासाठी शरद पवार,राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जयंत पाटील, रोहीत पवार, यांनी सभा घेतली तर मनसेचे ऊमेदवार रमेश तात्या गालफाडे यांना कुणाचीही सभा घेता आली नाही. त्याचबरोबर इतर पक्षांचेही उमेदवार या ठिकाणी उभे असून एकूण २२ उमेदवार केज मतदार संघात उभे आहेत त्यापैकी





प्रमुख दोनच उमेदवारांची दुरंगी लढत असून सर्वांनी आपापल्या पद्धतीने कॉर्नर सभा मोठ मोठ्या सभा बैठका व ऐनकेन सर्व प्रकारे मतदारांना आकर्षित केले आहे. प्रत्येक उमेदवाराने आपापल्या पद्धतीने राजकीय कट कारस्थान केले असून यात प्रामुख्याने कोण बाजी मारणार व विजयी गुलाल उधळणार हे शनिवार (दि. 23) रोजी सायंकाळी चित्र स्पष्ट होईल. दोन दिवस सर्वच राजकीय कार्यकर्ते नेते आपापल्या पद्धतीने विजयाचे गणिते मांडणार आहेत पण तरीसुद्धा या चौरंगी लढतीमध्ये कोण कोणाला शह देणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे कोण होणार नवीन आमदार, केज मतदार संघात आत्तापर्यंत यांची राजकीय कारकीर्द मतदारसंघाने पाहिले असून कोण बाजी मारणार याकडे जनतेचे लक्ष२३तारखेकडे लागेले आहे

## केज मध्ये लागणार साठेंची लॉटरी लागणार का?

केज राखीव विधानसभा मतदारसंघांमध्ये यावेळी कमळ कोमजणार आणि महाविकास आघाडी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार पृथ्वीराज साठे हे विजयी होणार. या मतदारसंघात त्यांना आमदारकीची लॉटरी लागणार अशी शक्यता निर्माण झाली आहे.

## दिव्यात टोरंटच्या दुर्लक्षामुळे वाहतूक कोंडी व शालेय विद्यार्थ्यांचे हाल.




संतोष पडवळ - प्रतिनिधी ठाणे, दिवा ता 22 नोव्हेंबर : दिवा-आगासन या मुख्य रस्त्यावरील एस एम जी शाळेच्या प्रवेश द्वारावर टोरंट वीज कंपनीचा बंद अवस्थेतील ट्रान्सफार्मर हटविण्याबाबत अनेक निवेदने देऊनही दुर्लक्ष करत असल्यामुळे याचा नाहक त्रास वाहन चालकांना व शालेय विद्यार्थ्यांना होत आहे. उपरोक्त विषयानुसार एस. एम. जी. विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, दिवा-आगासन रोड शाळेसमोर असलेला ट्रान्सफार्मर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून तातडीने काढण्यात यावा अशी मागणी शाळा प्रशासनाने अनेक वेळेस करूनही टोरंट पॉवर कंपनी दुर्लक्ष करत असल्याने याचा फटका शालेय विद्यार्थी, पालक, स्कुल बस याशिवाय दिवा- आगासन या मुख्य रस्त्यावरील वाहनांना पडत असून प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.
कित्येक वेळा पालक विद्यार्थ्यांना घेऊन जातात अनेक आपघात देखील झाले असून अनेक विद्यार्थी जखमी झाले आहेत. शाळा प्रशासनाने अनेक वेळा या संदर्भात टोरंट विद्युत विभागाशी पत्रव्यव्यहार करण्यात आला असून शाळेच्या मुख्यप्रवेशद्वारा जवळ असलेला ट्रान्सफार्मर तात्काळ हटविन्यासाठी आता संतप्त पालक वर्ग आक्रमक झाला आहे. वाहतूक कोंडी व आपघाताच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण होत आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तो त्वरित हटवावा अशी मागणी पालक आक्रमक झाले असून आंदोलन छेडण्याच्या तयारीत असल्याचे काही पालकांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

## आज दिग्गजांचे भवितव्य जाहीर होणार सकाळी 8 वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात

मुंबई : महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी झालेल्या निवडणुकीनंतर आज शनिवारी २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या एकूण ४१३६ उमेदवारांचे भवितव्य ठरणार आहे. सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. प्रथम पोस्टाने मिळालेल्या मतांची मोजणी होईल. त्यानंतर ईव्हीएम मतांची मोजणी सुरू होईल. महायुती की महाविकास आघाडी कोण बाजी मारणार हे दुपारपर्यंत स्पष्ट होईल. विधानसभा निवडणुकीत बहुतांश सर्वेक्षण संस्थांनी एक्झिट पोलमध्ये महायुतीवर बाजी मारली आहे. निवडणुकीचा निकाल जाहीर होण्याच्या एक दिवस आधीच राजकीय गोंधळ वाढला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीकडून सरकार स्थापनेचे दावे झाले आहेत. महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या बैठकीत निवडणुकीत विजयी आमदारांना मुंबईत बोलावून हॉटेलमध्ये राहण्याचा निर्णय घेण्यात आला. देवेंद्र फडणवीस यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या सागर बंगल्यावर भाजप नेत्यांची बैठक झाली, त्यात भविष्यातील रणनीतीवर चर्चा करण्यात आली.
विधानसभेच्या २८८ जागांसाठीच्या मतमोजणी बरोबरच नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणुकीची मतमोजणीही शनिवारी होणार आहे. विधानसभेच्या २८८ जागा आणि नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला मतदान झाले होते. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस चोक्कलिंगम यांनी सांगितले की, रात्री ८ वाजता मतमोजणी सुरू होईल. पोस्टाने प्राप्त झालेल्या मतपत्रिकांची प्रथम मोजणी केली जाईल. यानंतर ८.३० वाजता ईव्हीएम मतांची मोजणी सुरू होईल.
मतमोजणीसाठी ६ हजार ५०० मतमोजणी टेबल तयार आहेत. पोस्टल मतपत्रिकांची मतमोजणी सुमारे ४ हजार ईव्हीएम टेबल आणि २५०० टेबलवर होणार आहे. मतदान केंद्रांवर त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली

# केज विधानसभा मतदारसंघात शांततेत मतदान ,विडा बुथवर किरकोळ हाणामारी

--केज विधानसभा मतदारसंघात ६३.४ टक्के मतदान. सर्वत्र शांततेत पार पडले. मात्र विडा येथे मतदान केंद्रा बाहेर दोन गटात हाणामारी घटना घडली आहे. तर विधान विधानाच्या लोकांच्या प्रमाणे.३२३-(अ.जा. ) संघात ३ लाख ८ हजार २२१ एव झीला मतदान करण्यासाठी ४२० मतदान केंद्र होते. ३ लाख ८७ हजार २२१ १ लाख ३० हजार ८५४ पुरुष तर १ लाख हजार ९४३ स्त्री आणि २ तृतीय पंथी असे एकूण ६३.४८ टक्के,केज मतदार संघात दिव्यांग आणि मतदारांमध्ये उत्साही प्रचाराला ऊस तोडणी साखर उताऱ्यासाठी स्थानिक पातळीवर मतदानासाठी मतदानासाठी टक्का घटला आहे.मतदान शांततेत पार पडले. मात्र विडा मतदान केंद्रा बाहेर दोन गटात हाणामारीची घटना घडली. दरम्यान व्यतयाची आमची



एकही घटना घडली नाही. दरम्यान सर्वत्र चोख पोलिस बंदबस्त आणि सीमा सुरक्षा दलाच्या तुकडी यामध्ये सहभागी झाली. ---------

## वीड्यामध्ये बोगस मतदानातून दोन गटात हाणामारी

केज विधानसभा मतदार संघातील विडा येथे बोगस मतदानासाठी भाजप व राष्ट्रवादी शरद पवार, पवार गटात हाणामारीचा प्रकार विडा (ता. केज) येथील मतदान केंद्रावर घडला. या हनामारीचा व्हिडीओ ही सोशल मीडियावर व्हायरलही आहे.केज विधानसभा मतदारसंघात येत आहेत , येथे मतदान केंद्रावर सकाळपासून शांततेचा काळ सुरू असताना . भाजपचे स्थानिक नेते आणि पवार गटाचे सरपंच व त्यांचे पक्षात मतदान केंद्रावर हाणामारी सुरु झाली सर्वांनी सोडवण्याचा प्रयत्न केला. हीणामारी सुरू असताना व्हिडिओ सोशल मीडियावर चांगला व्हायरल झाला आहे. पोलिसांच्या मध्यस्थीने त्यांच्यातील हा वाद मिटला होता आणि मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली आहे. याची माहिती पोलीस अधिकारी कमलेश मीना यांनी भेटीगाठी घेऊन शांत राहण्याचे आवाहन केले

## सखी केंद्रासाठी मतदान केंद्र -

केज पंचायत समितीच्या आणि दिव्यांगांसाठी दिव्यांग केंद्र, तर कृषी उत्पन्न बाजाराच्या केंद्रे होती. या मतदान केंद्राच्या प्रवेशद्वारावर रांगोळीचा संदेश दिला होता. तर प्रवेशद्वारावर कमानी उभारून सुशोभित करण्यात आले होते. मतदान शांततेत आणि सुरळीत होण्यासाठी निर्णय अधिकारी दिपक वजाळे पोलीस अधिकारी अधिकारी विलास तरकेश गिड्डे, प्रियंका टोंगे, सृद्धी दिवाणे यांनी काम पाहिले.
तसेच शेकडो पोलिस अधीक्षक कमलेश मिना, पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन, सहायक पोलिस निरीक्षक बनसोडे, पोलिस उपनिरीक्षक मच्छिंदगे, पोलिस उपनिरीक्षक राजेश पाटील, पोलिस दल उपनिरीक्षक दल, पोलिस उपनिरीक्षक कादरी यांच्या सह सीमा सुरक्षा महिला, दंगल नियंत्रक आणि गृहरक्षक लोक संचार केंद्रावर तगडा बंदबस्त होता. ------------------------------

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादकः राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com